महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
चे कलम १५४ अन्वये निदेश
नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील मौजे-दिघे येथील झालेल्या अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक :- २० जुलै, २०१५.

निदेश

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

क्रमांक- टिपीएस-१२१५/१८६७/प्र.क्र.८७/१५/नवि-१२

ज्याअर्थी, शासन, नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ११३(३अे) अन्वये नवी मुंबई परिसरातील क्षेत्राचा विकास करण्याचे दृष्टीने अधिसुचना क्र. आरपीबी-११७३-II-आरपीसी, दि. १६/८/१९७३ नुसार 'शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित' हे नवनगर विकास प्राधिकरण म्हणून उदघोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे-बेलापूर पट्ट्यातील ठाणे इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स या रेखांकनातील औद्योगिक वापराचे विकासासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र औद्योगिक अधिनियमांतर्गत कार्यरत आहे.

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई परिसरातील ४४ गावांसाठी शासनाने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम ३ अन्वये अधिसुचना क्र. एनबीसी-१०९१/१४०/सीआर-१४/९१/युडी-२०, दि. १७/१२/१९९१ नुसार नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना केली आहे. तसेच शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. एनएमसी-११२०००/प्र.क्र.५४/०४/नवि-२८, दि. ८ जून, २००७ अन्वये त्यातील १४ गांवे वगळण्यात आली आहेत.

आणि ज्याअर्थी, मौजे-दिघे, ता. ठाणे हे गांव नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत असून या गावाचा काही भाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यरत असणा-या क्षेत्रात समाविष्ट आहे. तद्वतच सदर गावाचा काही भाग शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित या प्राधिकरणाचे हद्दीत आहे.

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिका ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला

आहे.) कलम २(१५) नुसार स्थानिक प्राधिकरण असून उक्त अधिनियमाच्या कलम २(१९) नुसार स्थानिक प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहेच.

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित ही प्राधिकरणे त्यांचे अखत्यारीत असलेल्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमांतर्गत नियोजन प्राधिकरणे म्हणून कार्यरत असून त्यांचे अखत्यारीतील क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याच्या व निष्कासनाच्या शक्ती महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार त्यांना प्राप्त आहेत.

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील मौजे-दिघे येथील होत असलेल्या अनाधिकृत बांधकामा संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १३८/२०१२ व ८०/२०१३ दाखल झाल्या असून दि. १४/७/२०१५ रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी मा. उच्च न्यायालयाने दिघे गावातील अनाधिकृत बांधकामाचे संदर्भात राज्य शासनाने वर नमूद तीनही प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १५४ अन्वये निदेश देण्यास सुचित केले आहे.

त्या अर्थी, शासन, नगर विकास विभाग, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम १५४ नुसार खाली उल्लेखिलेले निदेश जारी करीत आहे.

## निदेश

अ) दि. १७/१२/१९९१ चे अधिसुचनेत नमूद ४४ गावांपैकी विवक्षित क्षेत्र कुठल्या प्राधिकरणाचे हद्दीत समाविष्ट आहे, याबाबत स्पष्टता नसल्यास अशा क्षेत्रावरील अनाधिकृत बांधकामांबाबत स्थानिक प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिका यांनी कारवाई करावी.

ब) ज्या क्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिका स्थानिक प्राधिकरण आहे, अशा क्षेत्रात अधिकार क्षेत्राबाबत विवाद झाल्यास / संदिग्धता असल्यास अशा क्षेत्रावरील अनाधिकृत बांधकामांबाबत स्थानिक प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिका यांनी कारवाई करावी.

क) प्रत्येक प्राधिकरणाने त्यांची हद्द त्वरीत नकाशावर दाखवावी. तसेच त्याची कल्पना अन्य प्राधिकरणांना द्यावी.

वरील निदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(सुनिल फाटक)
कक्ष अधिकारी

प्रत : - **माहितीसाठी सादर.**

१) प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

३) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई.

४) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.

५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई.

७) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.